# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३९४- २३** **दिनांक : - ०८/११/२०२३**

## "ऑक्टोबर" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक १८/१०/२०२३ रोजी सपोनि प्रशांत गांगुर्डे, नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, हॉटेल विन्यासा रेसीडेन्सी, बि.पी. रोड, भाईंदर पुर्व, ता.जि. ठाणे येथे काही इमस ७/८ दिवसांपासून वास्तव्यास असून त्यांचेकडे अंमली पदार्थ आहेत व ते मिरा-भाईंदर परिसरात अंमली पदार्थाची विक्री करतात तसेच त्यांचेकडे अग्नीशस्त्र असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे मा. वरिष्ठांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे कारवाई करता सनी भरत सालेकर, विशाल सतिश गोडसे, दिपक जितेंद्र दुबे व शहबाज शेवा ई यांचेताब्यातुन एकुण २५१.७ ग्रॅम एम.डी., एम.डी. विक्री करुन मिळविलेली रोख रककम, एम.डी. विक्री करीता वापरलेली एक मोटार सायकल इ. तसेच सनी सालेकर याचे ताब्यात एक गावठी पिस्टल मॅगझिन व २ जिवंत राउंडसह जप्त करण्यात येउन त्यांचेविरुध्द प्रस्तुत गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर केलेल्या तपासामध्ये आरोपीत नामे तन्वीर निसारअहमद चौधरी याचेकडून १०२ ग्रॅम एम.डी. (मॅफेड्रॉन), एम.डी. विक्री करुन मिळविलेली रोख रक्कम व एम.डी. विक्री करीता वापरलेली एक चार चाकी वाहन जप्त करण्यात येउन त्यास दिनांक २१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आले. त्यानंतर आरोपीत तन्वीर निसारअहमद चौधरी याने दिलेल्या माहीतीप्रमाणे आरोपीत गौतम गुनाधर घोष याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आले.

आरोपीत गौतम गुनाधर घोष याने दिलेल्या माहीतीप्रमाणे आरोपीत समीर चंद्रशेखर पिंजार याचेकडे केलेल्या तपासामध्ये सर्व्हे नं २६४/२/ए, मोखाडा, पालघर येथील जागेत आरोपीत समीर चंद्रशेखर पिंजार याने बाधलेल्या घरात एम.डी. (मॅफेड्रॉन) तयार करण्यासाठी बनविलेली लॅब मिळून आली. त्यामध्ये १८१०० ग्रॅम एम.डी. तसेच एम.डी. तयार करणेसाठी रसायन, रासायनिक उपकरणे मिळून आली. ती जप्त करण्यात येउन त्यास दिनांक २२/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

तसेच आरोपीत सनी भरत सालेकर याने केलेल्या निवेदनप्रमाणे रुपये ९,६००/- किं.चे १ गावठी पिस्टल, ३ मॅगझिन व १२ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा-१ काशमिरा युनीटचे पोलीस निरीक्षक पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, सफौ. राजु तांबे, संदीप शिंदे, पो.हवा.संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड,सचिन हुले, सचिन सावंत, समीर यादव, पो.अं.प्रशांत विसपुते यांचा दिनांक ०८/११/२०२३ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि.श्री. अविराज कुराडे**

२) वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी नामे गुल्फराझ नासिर आलम, वय २६ वर्षे, व्यवसाय - स्क्रिन प्रिंटीग, रा. रुम नं. १०३ सायरा अपार्टमेंट, फणसपाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांची होंन्डा ॲक्टीवा ६जी मोटार साकयल क्रमांक एम.एच. ४८ सी.जी. ६३७३ ही त्यांचे घरासमोर उघडयावर पार्कीग केलेली असताना दिनांक १४/१०/२०२३ रोजी रात्री ०२.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. चे दरम्यान कोणी तरी अज्ञात चोरटयाने त्याचे संमती शिवाय, लबाडीने, उघडयावरुन चोरी केली म्हणून वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ८१२/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. या प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिल्याने श्री. विनायक नरळे, सहाय्यक उप आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनानुसार वालीव पोलीस ठाणेचे स.पो.नि. सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे विरार पुर्व, राजीवली, वसई कोळीवाडा येथुन आरोपी नामे १) शमशुददीन अब्दुल रज्जाक शेख, वय २८ वर्ष, व्यवसाय- नोकरी, रा. गणेश चाळ, रुम नं. २, डांबर प्लांट, गणपती मंदीराजवळ, राजीवली, नायगाव पुर्व, जि. पालघर २) फिरोज अब्दुल रज्जाक शेख, वय ३१ वर्ष, धंदा- बफींगकाम, रा. रुम नं. २०३, मंदा रिसॉर्ट चाळ, रामु कम्पाऊंड, चंदनसार, विरार पुर्व, जि.पालघर व ३) मुस्ताक मुन्ना शेख ऊर्फ शोयब टरकी, वय ३० वर्ष, व्यवसाय- रिक्षा चालक, रा. रुम नं, २१२, इकरा अपार्टमेंन्ट, डांगेवाडी, अकबर राईस मिल जवळ, नालासोपरा पश्चिम, जि. पालघर यांना शिताफीने पकडुन त्यांच्याकडुन चोरी केलेल्या ८ मोटार सायकल व ४ ऑटो रिक्षा असे एकुण अं.रु. ५,२६,०००/- किंमतीची १२ वाहने जप्त करण्यात आले इकडील आयुक्तालयातील १० व ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील १ व मुंबई पोलीस आयुक्तालयातील १ असुन एकुण १२ गुन्हे उघड केले आहेत.

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.क्र. | गु.र.क्र.व कलम | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र. ८१२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| २ | गु.र.क्र. ८१५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| ३ | गु.र.क्र. ८२६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |
| ४ | गु.र.क्र. ८२८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | वालीव पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | गु.र.क्र. ९०८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | पेल्हार पोलीस ठाणे |
| ६ | गु.र.क्र. ३९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | विरार पोलीस ठाणे |
| ७ | गु.र.क्र. ५६२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | विरार पोलीस ठाणे |
| ८ | गु.र.क्र. ५३०/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | काश्मीरा पोलीस ठाणे |
| ९ | गु.र.क्र. १३८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | माणिकपुर पोलीस ठाणे |
| १० | गु.र.क्र. ७५६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | तुळींज पोलीस ठाणे |
| ११ | गु.र.क्र. ११९१/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| १२ | गु.र.क्र. ५९९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे | मालाड पोलीस ठाणे, मुंबई शहर |

सदरची कामगिरी करणारे वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी, तसेच पो.हवा.भालचंद्र बागुल, अमोल बरडे नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ २ यांचा दिनांक ०८/११२२०२३ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि श्री. जयराज रणवरे**

३) काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं.७००/२०२३ भा.द.वि.सं.क.३०७ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ प्रमाणे सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असुन नमुद गुन्हाची माहीती पोलीस ठाण्यात मिळाताच त्याबाबत मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे गुन्हयाचा तपास चालु सुरु करुण गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करण्यात करण्यात आले.त्यानुसार तपास पथकानी अधिकारी व अंमलदार यांनी परिसरातील सुमारे ४०० ते ५०० सी.सी.टी.व्ही फुटेज तपास करुण आरोपी निष्पन्न केला.त्यानंतर तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फतीन मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत क्रं.१ यास साकीनाका मेट्रो स्टेशन जवळुन ताब्यात घेण्यात आले आहे.सदर गुन्हात आरोपीत याचा सहभाग निष्पन्न झाला असुन सदर आरोपीत यांने सदर गुन्हा हा त्याचे इतर दोन साथीदारसह केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीत याचेवर मुबई पोलीस आयुक्तालयात एकुण १५ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशमीरा पोलीस ठाणे, पोनि समीर शेख, सपोनि योगेश काळे,महेश मनोरे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, हर्षल राउत, अशोक भान्सी, स्वप्लील बेलोसे, स.फौ. अनिल पवार, पो.हवा. दिपक वारे, प्रतापनेताजी पाचुंदे, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, स्वप्निल मोहीले, सतिश निकम, महेश इंगळे, अशोक पालवे, निलेश घडवई, उमेश पवार, रविंद्र कांबळे, पो.अं. प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी, शरद नलवडे, अनिल मढवी, साईदास चव्हाण, सुरेश बजंत्री नेमणुक कशमीरा पोलीस ठाणे तसेच पोहवा जयप्रकाश जाधव नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ १ यांचा दिनांक ०८/११२२०२३ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री.संदिप कदम**

४) पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.१७/१०/२०२३ रोजी दुपारी ४.३० वा.च्या सुमारास फिर्यादी श्री. इम्रानहुसेन लियाकतहुसेन शेख, वय ३१ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. पेल्हार नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांच्या हातातुन पेल्हार हॉटेलच्या समोरुन मुंबई-अहमदाबाद हायवे रोडने मुंबई बाजुकडुन लाल रंगाच्या पल्सर मोटार सायकलवरुन तिन इसमांनी भरधाव वेगात येऊन फिर्यादी यांच्या हातातील मोबाईल जबरीने खेचुन जबरी चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९४०/२३ भा.द.वि.स कलम ३९२, ३४ अन्वये दिनांक १८/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद झाला आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गवर पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत तसेच लगतच्या पोलीस ठाण्याचे हद्दतीत जबरीने मोबाईल चोरी करण्याचे प्रमाण वाढल्याने सदर गुन्हयाचे गांर्भीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखचे अधिकारी अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंघाने योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंघाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सोपान पाटील यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अंमलदार यांचे ०४ पथके तयार करुन तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळावरील, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तसेच लगतचे ४० सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन त्याव्दारे आरोपीत यांचे फोटो व पल्सर १२५ मोटारसायकल क्रमांक प्राप्त करुन तसेच गुप्त बातमीद्वारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत यांचा आरोपीत हे सोपारा फाटा येथुन मुंबई बाजुकडे जात असतांना त्यांचा पाठलाग करुन तुंगारेश्वर फाटा येथे आरोपीत नामे -१) सपनजी सुरेंद्र प्रसाद ऊर्फ जेडी, वय १८ वर्षे, रा. वालीव, ता. वसई जि. पालघर,२) शिवा शंकर सरोज, वय १९ वर्षे, रा. वालीव गाव, ता. वसई जि. पालघर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक, यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यात एकुण १३ मोबाईल फोन व गुन्हा करण्याकरीता वापरलेली पल्सर

मोटारसाकल असा एकुण २,३१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.

पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४०/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४१/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४८/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९५०/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२१/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२३/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२४/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.
नायगाव पो.स्टे गु.र.क्र.३४५/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.

सदरची कामगिरी करणारे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, श्री. सोपान पाटील, सहा.पोलीस निरीक्षक, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, मिभावव‍ि पोलीस आयुक्तालय यांचा **" ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-१ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. वसंत लब्दे**

५) तुळींज पोलीस ठाणे अकस्मात मृत्य रजि नं २२१/२०१९ सी आर पी सी १७४ प्रमाणेच्या चौकशी अधिकारी महीला पोलीस उप निरीक्षक/श्रीमती संध्या पवार यांनी अकस्मात मृत्युचे चौकशी करुन चौकशीअंती सरकारतर्फे फिर्याद दिल्यावरुन तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ११९७/२०१९ भादविस कलम ३०२, ३४ प्रमाणे या गुन्हयातील मयत जोसेफ उर्फ चिन्डीनिजु अमएची विल्सन(देश - नायझेरीया)वय ३५ वर्ष रा. हायटेंशनरोड, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व यास दिनांक १६/१०/२०१९ रोजी ०२.४५ वाजता पुर्वी नुर अपार्टमेंटच्या खाली रोडवर, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व येथे गुन्हयातील आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन अंमलीपदार्थाच्या नशेवरुन तिक्ष्ण हत्याराने मारहाण करुन जिवे ठार मारल्याबाबत दिनांक २४/१०/२०१९ रोजी १०.४५ वाजता सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील तपासिक अधिकारी यांनी नमुद गुन्हयाचा तपास करुन तपासात १) नसीरखान वलीमहोम्मद खान २) आशिष उर्फ विक्की रोजेश मिश्रा ३) अमित अमर सिंह ४) कांचा रा. नालासोपारा पुर्व पुर्ण नाव पत्ता माहीत नाही अशा ४ आरोपीतांची नावे निष्पन करुन त्यापैकी नसीरखान वलीमहोम्मद खान या आरोपीतास

गुन्हयात अटक करुन त्यांचे विरोधात मा. वसई न्यायालयात दोषारोप सादर केले होते. गुन्हयातील पाहीजे आरोपीत हे सापडुन न आल्याने त्यांना गुन्हयात अटक करता आले नव्हते.

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध गंभीर गुन्हयांतील पाहीजे व फरार निष्पन्न परंतु नजेराआड असणारे आरोपीत यांचा शोध घेवून अटक करण्याबाबत वरीष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ११९७/२०१९ भादविस कलम ३०२, ३४ प्रमाणे या गुन्हयाचे झाले तपासाबाबत व गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची पोलीस ठाण्यातुन माहीती प्राप्त करण्यात आली. पाहीजे आरोपीताचा शोध घेण्याअनुषंगाने घटनेबाबत गुन्हयाचे घटनास्थळी जावून गुन्हे शाखेच्या गुन्हे प्रगटीकरणाचे कौशल्याचे आधारे गुप्त बातमीदाराकरवी माहीती प्राप्त केल्यानंतर सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीत कांचा रा. नालासोपारा पुर्व याचे पुर्ण नाव रोशन बैचन मंडल उर्फ कांचा असे असल्याचे निष्पन्न करण्यात आले. सदर पाहीजे आरोपीताचे वास्तव्याबाबतची माहीती घेत असताना सदर आरोपीत हा गुन्हा घडले प्रकारानंतर ६ महीने बँगलोर, कर्नाटक येथे वास्तव्यास होता व त्यानंतर सध्या तो अश्पाक महोम्मद शेख हे खोटे नाव धारण करुन डॉनलेन परीसरात वास्तव्यास असल्याची माहीती प्राप्त करण्यात आली. नमुद आरोपीताचा कसोशिने आजूबाजुचे परीसरात शोध घेवून गुप्त बातमीदाराकडुन ओळख पटवुन त्यास सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता सदर आरोपीताचा ४ वर्षापुर्वी घडलेल्या सदरच्या गुन्हामध्ये सहभाग निष्पन्न झाला आहे.

<u>अटक करण्यात आलेल्या पाहीजे आरोपीताचे नाव :-</u> रोशन बैचन मंडल उर्फ कांचा वय २८ वर्ष रा. जय भारत बिल्डींग रुम नं १०५, डॉन लेन, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, प्रफुल पाटील,दादा आडके पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर पो.अं.अमोल कोरेश् सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई,मसुब अविनाश चौधरी,रामेश्वर केकाण यांचा **"ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-२ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. शाहुराज रणवरे**

६) नयानगर पोलीस स्टेशन गु रजि. क्र. ए ५४४/२०२३ भादविसंक ४५४,४५७,३८० प्रमाणे दिनांक १७.१०.२०२३ रोजी १४.०० ते दिनांक १८.१०.२०२३ रोजी ०१.०० वाजेचे सुमारस फिर्यादीचे राहते घरी रुम क्र. ३०६,कमर अपार्टमेन्ट नयानगर ,मिरारोड पुर्व येथे सदर आरोपीने फिर्यादीचे संमतीने घराचा दरवाजा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करुन लोखंडी कपाटातील १६,४०,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घर फोडी चोरी केल्याने दिनांक १८.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा हे करीत होती. सदर गुन्हयाचे घटनास्थळाचे सीसीटिव्ही पाहिले असता आरोपीत हा चोरी करण्यासाठी बिल्डींगमध्ये

जाताना व चोरी करुन बाहेर येवुन तेथुन पायी जात असताना दिसुन आला त्यानंतर आजुबाजुचे सीसीटिव्ही फुटेज पाहिले असता आरोपी हा प्रवासी रिक्षात बसुन जात असल्याचे दिसुन आले. सदर रिक्षाचा क्रमांक प्राप्त करुन त्याचे चालकाकडे आरोपीचे बाबत माहिती घेतली असता त्याने सदर आरोपीस अंबाडी नाका, माणिकपुर, वसई येथे सोडल्याचे सांगितले. अंबाडी नाकाचे आजुबाजुचे सीसीटिव्ही फुटेज पाहिले तसेच आरोपीची माहिती गुप्त बातमीदार यास सांगितली असता आरोपी हा माणिकपुर नाका, दिवानमान तलावाचे बाजुला रुम नं१०१, शितल छाया बिल्डींग, वसई जि. पालघर येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले परंतु आरोपी त्याचे राहते घरी मिळुन आला नाही. आरोपीची गुप्त माहिती काढुन त्याचा सदयाचा वापरता मोबाईल क्रमांक ८१०८०१२०९८ प्राप्त करुन सदर मोबाईलचे तांत्रिक माहितीमध्ये आरोपी हा रोहतक हरयाणा या ठिकाणी असल्याचे समजले. सदर आरोपीस गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे राजीव गांधी स्टेडियम जि. रोहतक ,राज्य हरियाणा येथुन एसटीएफ जि.हरियाणा यांचे मदतीने ताब्यात घेण्यात आले असुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरी गेलेला माल जप्त करण्यात आला आहे.पुढील तपास नयानगर पोलीस ठाणे करीत आहेत.

सदरची कामगिरी करणारे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार राख,स.पो.नि. दत्तात्रय सरक,पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, स.फौ. श्रीमंत जेधे, पो.हवा,मनोहर तावरे, राजविर संधु, संग्राम गायकवाड, राजाराम कांबळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, प्रविणराज पवार, सतिष पवार, महेश वेल्हे, पो.अं.हनुमंत सुर्यवंशी यांचा तसेच

नयानगर पोलीस ठाणेच वपोनि विलास सुपे,सपोनि पराग भट, पो.हवा.रियाज बागवान, विकास यादव, विजय गुरव, सोमनाथ सांडभोर, प्रमोद केंद्रे, महेश खामगळ, जयप्रकाश जाधव यांचा **"ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. राहुल राख**